राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या
"राज्य कार्यकारी समितीच्या" सदस्य
सचिव पदावर नियुक्ती करणेबाबत.

उपमाड.नाईक

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १००४/प्र.क्र.९२/पापु.०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक - ११ जून,२००४.**

वाचा :- शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००४/प्र.क्र.४७/पापु.०७ दि. २ एप्रिल,२००४

प्रस्तावना:

केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजना तसेच, संपूर्ण स्वच्छता अभियानाचे राज्य स्तरावरील अपेक्षित संचालन, निधी वितरण,मार्गदर्शन व सनियंत्रण या बाबींच्या अनुषंगाने अपेक्षित कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी **"राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन"** गठीत करुन या मिशनमध्ये **"राज्य शिखर समिती"** व **"राज्य कार्यकारी समिती"** अशा दोन समित्या गठीत करण्यास उपरोक्त दिनांक २ एप्रिल,२००४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.राज्य कार्यकारी समितीच्या रचनेत सह सचिव/उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हे समितीचे सदस्य सचिव असतील असे नमूद करण्यात आले आहे. त्यामूळे या समितीवर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील **"उप सचिव तथा संचालक"** (सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष) यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजना तसेच, संपूर्ण स्वच्छता अभियानाचे राज्य स्तरावरील अपेक्षित संचालन, इत्यादिसाठी उपरोक्त दिनांक २ एप्रिल,२००४ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमधील **"राज्य कार्यकारी समितीवर"** सदस्य **सचिव म्हणून उप सचिव तथा संचालक (सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांची नियुक्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सुधाकर ज्ञा.बोबडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
४. राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीचे व कार्यकारी समितीचे सर्व सदस्य.
५. विभागीय आयुक्त (सर्व)
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
७. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०. उप संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,(सर्व)
११. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,(सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
१४. निवडनस्ती (पापु.०७)